**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ११९ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.रामकृष्ण नामदेवराव दांदळे,
मु.पो.खिरपुरी बु., ता.बाळापुर,
जि.अकोला.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय, बाळापुर
ता. बाळापुर, जि.अकोला.

**२.**जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, बाळापुर,
ता.बाळापुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक ०१/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.रामकृष्ण नामदेवराव दांदळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, बाळापुर श्री.आर.डी. पवार हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, बाळापुर श्री.एन.एन. गावंडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन निवासी नायब तहसिलदार, बाळापुर श्री. डी.पी. पुंडे हे हजर आहेत. .

आज सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक श्री.एन.एन. गावंडे हे हजर आहेत त्यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराच्या अर्जावर ३ महिने कार्यवाही झाली नाही . अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली परंतु अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदरची माहिती उशिरा पुरविण्यात आली म्हणुन संबंधितावर कार्यवाही करावी असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

वरील बाबी लक्षात घेवुन अर्जदाराला माहिती उशिरा प्राप्त झाल्यामुळे अर्जदारास झालेल्या शारीरिक व मानसिक त्रासाबाबत अर्जदाराला २५००/- रु. नुकसान भरपाई म्हणुन सार्वजनिक प्राधिकरणाने ६ आठवडयाच्या आंत दयावी व सदरची रक्कम सार्वजनिक प्राधिकरणाने दयावी किंवा संबंधिताकडुन वसुल करायची याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय हे निर्णय घेतील.

**वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**प्रत,**

**जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १२० / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.मधुकर श्रीरामजी कुटेमाटे,
ह.मु.नागोराव धर्माळे यांचे घरी,
सिव्हील लाईन, वार्ड नं.२५,
दर्यापुर ४४४८०३ ता.दर्यापुर, जि.अमरावती.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती

**२**.जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद,
अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक ०१/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी यांचे वतीने त्यांचा मुलगा श्री.धनंजय मधुकर कुटेमाटे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे अधिक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, अमरावती श्रीमती तुरपूडे हया हजर आहेत.

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.मधुकर श्रीरामजी कुटेमाटे हे दिनांक १४/०९/२०१० रोजी मयत झाले. आज सुनावणाचे वेळी त्यांचे चिरंजीव धनंजय मधुकर कुटेमाटे हे हजर आहेत. उत्तरवादी अधिक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, अमरावती श्रीमती तुरपूडे हया हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराला पाहिजे असलेली माहिती दिनांक २१/११/२००९ ला पुरविण्यात आली आहे. अर्जदार मयत झाल्यामुळे अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते. तसेच अर्जदाराचे चिरंजीव यांनी अधिक माहितीची आवश्यकता असल्यास किंवा माहिती बाबत समाधान न झाल्यास दुसरा अर्ज करावा.

**वरील बाबी लक्षात घेता सदरचे अपिल खारीज करण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १२१ / २०१०**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री.ऋषीकेश कृष्णराव काजळे,

'शुभंकरोती' मोहता प्लॉट, वार्ड नं. २,

नांदुरा, जि.बुलडाणा.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, नांदुरा, जि.बुलडाणा.

**२**. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल,
नगर परिषद, नांदुरा, ता.नांदुरा, जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ०१/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.ऋषीकेश कृष्णराव काजळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, नांदुरा श्री.एस.जी. देशपांडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद, नांदुरा श्री.एन.एन. सुरळकर हे हजर आहेत.

सदर प्रकरणात तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद, नांदुरा, जि.बुलडाणा श्री.कुशल एन. छाजेड, यांनी दिनांक ३१/१२/२००९ रोजी प्रथम अपिलामध्ये खालील आदेश पारीत केला.

आदेश - अपिलार्थी यांच्या माहिती मागणी अर्जानुसार तसेच नगर परिषद रेकॉर्डच्या उपलब्धतेनुसार माहिती पुरविण्यात आल्याचे दिसते. माहिती संबंधित जागेच्या / बांधकामाच्या क्षेत्रफळाबाबत कर विभागाकडुन त्यांचे इमारतीवरील कर आकारणी नकाशाचे माहितीवरुन क्षेत्रफळाबाबतच्या माहितीच्या प्रति सहाय्यक कर निरीक्षक यांचेकडुन कनिष्ठ अभियंता यांनी प्राप्त करुन घेवुन सदर माहिती त्वरीत अपिलार्थी यांना पुरविण्यात यावी व एक प्रत जनमाहिती अधिकारी यांना पुरवावी.

त्यानुसार अर्जदारास माहिती पुरविणे अपेक्षित होते. परंतु श्री. एस.जी. देशपांडे , मुख्याधिकारी यांचे म्हणण्यानुसार सदर प्रकरणात अर्जदाराचे मागणीनुसार श्री.संजय घाटे यांचे संबंधित बांधकामाबाबत नकाशा किंवा त्याबाबत कुठलाही पुरावा किंवा आदेश कर निरीक्षक, यांचेकडे उपलब्ध नाही, त्यामुळे दिनांक ३१/१२/२००९ च्या आदेशा नुसार माहिती पुरविण्यात आलेली नाही. तरी, सदर प्रकरणात मुख्याधिकारी, नगर परिषद, नांदुरा यांनी अर्जदाराला जागेच्या बांधकामाबाबत उपलब्ध असलेली माहिती तसेच बांधकामाची परवानगी बाबत व मंजुर नकाशाबाबत माहिती अर्जदाराला लेखी स्वरुपात स्पष्टीकरण देवुन कळवावे तसेच संबंधित बांधकामाचे किंवा कराबाबत जसे कर वसुल होत असेल तर ते कोणत्या वर्षीपासुन व किती कर आहे याबाबत लेखी पत्र आजपासुन ८ दिवसाचे आंत दयावे.

**वरील सुचना व आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**

**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.१२२/ २०१०**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

गं.भा.गिताबाई वि.गोविंद ताजने,
व्दारा भगत, माजी उपजिल्हाधिकारी,
बळवंत कॉलनी, पो.गांधीनगर, अकोला.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग,
सिंचन शाखा, अपर वर्धा कॉलनी, अमरावती.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग,
अपर वर्धा कॉलनी, अमरावती, जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक ०१/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी गं.भा.गिताबाई वि.गोविंद ताजने हया हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे अधिक्षक, अकोला पाटबंधारे मंडळ कार्यालय, अकोला श्री.एस.डी. तायडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे उपकार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती श्री.प्रदिप इंदुरकर हे हजर आहेत.

आज सुनावणीचे वेळी अर्जदार गं.भा.गिताबाई वि.गोविंद ताजने हया हजर आहेत. त्यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात आली फक्त श्री.गोविंद ताजने यांचे सेवापुस्तकाची प्रत पुरविण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार सेवा पुस्तक उपलब्ध नाही. तरी जन माहिती अधिकारी यांनी सेवापुस्तकाचा पुन्हा शोध घेवुन सेवापुस्तक मिळाल्यास अर्जदारास विनाशुल्क माहिती पुरवावी.

**वरील सुचना देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १७०४ / २०१०**
**(नविन क्रमांक १० / २०१०)**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.निजामुद्दिन ललकार,
पठाणपुरा, मुर्तीजापुर, जि.अकोला.
**विरुध्द**
**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग,
अमरावती
**२**. जन माहिती अधिकारी ,
शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग कार्यालय,
अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक ०१/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.निजामुद्दिन ललकार हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, उपसंचालक कार्यालय, अमरावती श्री.के.व्ही. गोमासे हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगासमोर व्दितीय अपिलात अशी तक्रार केली की, अर्जदाराने दिनांक २१/०४/२००८ च्या सुनावणी दरम्यान लेखी युक्तीवाद दाखल केला होता व त्या दिवशी सुनावणी होवुन अर्जदार यांना त्या बाबत कुठलाही निर्णय कळविण्यात आला नाही व यासंबंधी अर्जदाराने दिनांक २९ मे २००८ ला सुध्दा पत्र दिले. तरी याबाबत शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी घेतलेल्या निर्णयाची प्रत व सुनावणी घेतल्याची टिपणीची प्रत लेखी स्वरुपात अर्जदाराला आजपासुन १५ दिवसाचे आंत पंजीबध्द डाकेने अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पाठवावी.

**वरील सुचना व आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**